महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ
Maharashtra State Board of Secondary and Higher Secondary Education

नागपूर विभागीय मंडळ, सिव्हिल लाईन्स, नागपूर -440 001

e-mail :-msboardnagpur@gmail.com www.nagpureduboard.in

पत्र क्रमांक : नाविमं/गो.उ.मा./ 701
दिनांक: २८/०२/ २०२४

प्रति,
प्राचार्य,
सर्व मान्यता प्राप्त औद्योगिक प्रशिक्षण संस्था,
सर्व जिल्हे (भंडारा,चंद्रपूर,नागपूर,वर्धा,गडचिरोली,गोंदिया)
नागपूर विभाग नागपूर.
(मंडळ सांकेतांक-----------------------)

विषय:- आय.टी.आय. मधील व्यवसाय विषय घेऊन उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांना ट्रान्सफर ऑफ क्रेडिट चे गुणदान करून इ. 12 वी ची गुणपत्रिका व प्रमाणपत्र प्रदान करण्याच्या प्रक्रियेबाबत.

संदर्भ:- 1)पत्र क्र. रा.मं./संशोधन/समकक्षता/487 पुणे-411004 दिनांक - 05/02/2024.
2)पत्र क्र. रा.मं./संशोधन/488 पुणे-411004 दिनांक - 05/02/2024.
3)शासन निर्णय क्र.:औप्रशि - २०१८/प्र.क्र.११०/एस डी २, दिनांक २७ सप्टेंबर २०१८.

उपरोक्त संदर्भिय पत्राच्या अनुषंगाने आपणांस कळविण्यात येते की, मंडळ कार्यालयाच्या असे निदर्शनास आले आहे की, काही औद्योगिक प्रशिक्षण संस्था(आय.टी.आय.) कडून आय.टी.आय. प्रवेशीत विद्यार्थी व संबंधित पालकांना आय.टी.आय. सोबत इ १२ वी परीक्षेला प्रविष्ट झाल्यास एकाच वेळी दोन्ही परीक्षा उत्तीर्ण होवून त्यांचे वर्ष वाया जाणार नाही असा प्रसार करून विद्यार्थी संख्या वाढविली जात आहे. तसेच अशा विद्यार्थ्यांची इ. १२ वी परीक्षेची आवेदन पत्रे सादर केली जात आहेत. वास्तविक क्र.:औप्रशि - २०१८/प्र.क्र.११०/एस डी २, दिनांक २७ सप्टेंबर २०१८ शासन निर्णयानुसार औद्योगिक प्रशिक्षण संस्था(आय.टी.आय.) मध्ये प्रवेशित विद्यार्थी संबंधित व्यवसाय परीक्षा उत्तीर्ण होणे अनिवार्य राहील, अशी तरतूद आहे. मात्र प्रत्यक्षात आय.टी.आय. प्रवेशीत विद्यार्थ्यांना संबंधित परीक्षा उत्तीर्ण होण्यापूर्वीच इ.१२वी परीक्षेकरीता प्रविष्ट केले जात असल्याचे मंडळाच्या निदर्शनास आले आहे. त्यामूळे मंडळाच्या नियमित विद्यार्थ्यांच्या निकालासोबत अशा विद्यार्थ्यांचा निकाल देता येत नाही व त्याचा निकाल राखीव ठेवावा लागतो व त्याचा परिणाम मंडळाच्या निकालावर होतो.

तेव्हा उपरोक्त शासन निर्णयातील तरतुदी नुसारच औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमधून परीक्षा उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांचीच आवेदनपत्रे मंडळाकडे सादर करण्यात यावे. तसेच आय.टी. आय. चे ट्रान्सफर ऑफ क्रेडिटसचे गुण निकालापूर्वी मंडळाकडे प्राप्त होणे आवश्यक आहे. जेणे करून संबंधित विद्यार्थ्यांचा निकाल मंडळाच्या नियमित विद्यार्थ्यांच्या निकालासोबत जाहीर करणे सोईचे होईल.

सदर बाब पत्र क्र. रा.मं./संशोधन/समकक्षता/487 पुणे-411004 दिनांक - 05/02/2024 रोजीच्या पत्रान्वये संबंधित औद्योगिक प्रशिक्षण संस्था(आय.टी.आय.) ना अवगत करून देण्यात येते की, **सदरचे गुण निकालापूवी विभागीय मंडळाकडे प्राप्त न झाल्यास अशा विद्यार्थ्यांच्या नुकसानीला मंडळ जबाबदार राहणार नाही याची संबंधितांनी नोंद घ्यावी.** अपवादात्मक परिस्थितीमध्ये प्रमाणपत्राच्या दुरूस्त्या होण्यापूर्वी म्हणजे जास्तीत जास्त ३१ ऑगस्ट पर्यंत ट्रान्सफर ऑफ क्रेडिट चे गुण प्राप्त झाल्यास त्या दुरूस्त्या करण्यात येवून प्रमाणपत्र देता येईल. **त्यानंतर** Reserve **राहिलेले सर्व विद्यार्थी** Absent **दाखवावे लागतील व अशा विद्यार्थ्यांनी पुढील परीक्षेसाठी पुनश्च: आवेदन पत्रे भरणे आवश्यक राहील.** याबाबत आपल्या स्तरावर विद्यार्थ्यांना अवगत करून द्यावे.

(चिंतामण वंजारी)
विभागीय सचिव,
नागपूर विभागीय मंडळ नागपूर.